# मीरा  भाईंदर येथे मोफत दाखले वाटपाचा १२ हजार नागरिकांना लाभ

**ठाणे/प्रतिनिधी**

**तहसीलदार कार्यालय ठाणे व संजीवनी यांच्या विद्यमानाने आज मीरा-भाईंदर येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत दाखले वाटप शिबिराचा सुमारे १२ हजार नागरिकांनी लाभ घेतला. विशेष म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ५हजार अधिक नागरिकांनी यात सहभाग नोंदविला आहे. गतवर्षी ७ हजार नागरिकांनी या शिबिरातून दाखले मिळवले  होते. ठाण्याचे खा. डॉ. संजीव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. खा. डॉ. संजीव नाईक यांचे यावेळी नागरिकांनी, महिलांनी, युवकांनी आभार मानले.**

मीरा भाईंदर येथील सेंट जोसेफ चर्च शीतलनगर येथे मोफत दाखले वाटप शिबीर अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहात संपन्न झाले. सकाळी ९ वाजता खा. डॉ.संजीव नाईक यांच्या हस्ते दीपपूजन करून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ठाण्याचे तहसीलदार कृष्णा  जाधव, प्रांताधिकारी माधव पाटील, मीरा-भाईंदरचे उपमहापौर जयंत पाटील, नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील, आदी मान्यवर, नगरसेवक उपस्थित होते.

शिबिराला सुरूवात झाल्यानंतर प्रथम नोंदणीवरून दुपारी २ वाजेपर्यंत जात, नॉन क्रिमिलेअर, उत्पन्न, अधिवास आणि राष्ट्रीयत्वाच्या दाखल्यांचे अर्ज वाटप करण्यात आले. नागरिकांनी सोबत आणलेल्या दाखल्यासाठी आवश्यक कागदपत्रांची छाननी तसेच विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांकडून साक्षांकनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दाखले नमुना अर्जाची तपासणी करून स्वीकृत केल्यानंतर दुपारी २ ते ५ यावेळेत उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखल्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी खा. डॉ. संजीव नाईक स्वत: प्रत्येक बुथवर जाऊन दाखले छाननी करणारे तहसील विभागाचे कर्मचारी, विशेष कार्यकारी अधिकारी यांच्याकडून माहिती जाणून घेतली.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना मीरा भाईंदर येथील नागरिकांना दाखले मिळविण्यासाठी ठाण्याला जावे लागते. त्यातच जिल्ह्याचे एकच तहसील कार्यालय असल्याने त्याठिकाणी पडणारा संपूर्ण बोजा दाखले वेळेवर मिळत नसल्याने शालेय विद्यार्थी तसेच विविध लाभार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी हा उपक्रम मागील वर्षांपासून मीरा-भाईंदरमध्ये राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

गतवर्षी असणारा ७ हजार नागरिकांच्या सहभागाचा आकडा यंदा १२ हजारावर पोहोचल्याबद्दल खा. डॉ. संजीव नाईक यांनी या शिबिराला सहकार्य  करणाऱ्यांच्या मेहनतीचे  यश असल्याचे  सांगून त्यांचे  कौतुक केले.

ठाण्याचे तहसीलदार कृष्णा जाधव यांनी नवी मुंबईत नुकत्याच नवी मुंबई शिक्षण संकुलाच्यावतीने आयोजित दाखले वाटप शिबिरात १५ हजार नागरिकांनी शिस्तबद्ध पद्धतीने लाभ घेतल्याचे आवर्जून सांगितले. ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गणेश नाईक, खा. डॉ. संजीव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली  अशा प्रकारचा लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

यावेळी दाखले मिळविण्यासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी, महिलांनी,शालेय विद्यार्थ्यांनी, पालकांनी खा.डॉ. संजीव नाईक, तहसीलदार कृष्णा जाधव यांचे ऋण व्यक्त केले. अशा प्रकारचा उपक्रम वर्षातून दोनदा दर सहा महिन्यांनी राबविण्याची आग्रही मागणी खा. डॉ. संजीव नाईक यांच्याकडे पालकांनी केली. विविध योजनाच्यासाठी दाखले आवश्यक असल्याने एकाच छताखाली दाखले मिळत असल्याने नागरिकांची गैरसोय सुरू होईल, असा विश्वास नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांनी व्यक्त केला.

तहसील विभागाचे २२५ कर्मचारी, २० विशेष अधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिबिरात हजेरी लावली होती.